# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

## वित्त व लेखा विभाग

## आय.एस.ओ.९००१-२००८ युनिट

## परिपत्रक

मा. कुलगुरु यांच्या समवेत झालेल्या चर्चेनुसार वसतिगृह प्रमुख यांचेकडून एम.फिल. व पीएच.डी. करणा-या विद्यार्थ्यांची सत्रनिहाय यादी विभागास प्राप्त होणार आहे. तसेच प्रत्येक महिन्याला वसतिगृहामध्ये घेतलेले नविन प्रवेश, रद्द केलेले प्रवेश तसेच तात्पुरत्या स्वरुपात घेतलेले प्रवेश यांची देखील माहिती वसतिगृह कार्यालयाकडून प्राप्त होणार आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती अदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

यासंदर्भात सुसूत्रता आणण्यासाठी अधिछात्रवृत्ती व घरभाडे भत्ता यासाठी विकेंद्रित वित्त व लेखा विभागामध्ये अर्ज सादर करताना अधिछात्रांनी खालील बाबींची पूर्तता करावी.

१) प्रत्येक महिन्याच्या अधिछात्रवृत्ती व घरभाडे भत्ता यासाठी त्या महिन्यामध्येच अर्ज सादर करावा.

२) मार्गदर्शक आणि विभागप्रमुख यांचे प्रमाणिकरण झाल्यानंतरच विकेंद्रित वित्त व लेखा विभागामध्ये अर्ज सादर करावा.

३) उपरोक्त बाबी पूर्ण करुन सदरील अर्ज प्रत्येक महिन्याच्या २५ ते ३० या तारखांमध्येच विकेंद्रित वित्त व लेखा विभागाकडे सादर करण्यात यावेत.

सीए (डॉ.) विद्या गारगोटे,<br>
वित्त व लेखा अधिकारी

जा.क्र. वित्त/२०१५-१६/१६०९<br>
दिनांक : १० ऑक्टोंबर, २०१५

**प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग

२. विकेंद्रित वित्त शाखाप्रमुख.

***टिप : यापूर्वीचे वित्त व लेखा विभागाचे परिपत्रक जा. क्र. वित्त/अनुदान/२०१५-१६/९७० दि. ११.८.२०१५ हे रद्द समजण्यात यावे.***